# जल जीवन मिशन कार्यक्रम अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजना

# अटी व शर्ती

सर्व निविदा प्रक्रीया फक्त ऑनलाईन राहील. निविदा अपलोड डाउनलोड करणे अथवा या निविदेसंबंधाने सर्व सुचना व त्या बाबतची कार्यवाही यापुढे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरच राहील. निविदा स्विकृतीसाठी खालील प्रमाणे कागदपत्र PDF or Scan Copy Format मध्येच वरील संकेतस्थळावर अपलोड करणेत यावी.

**अ) पाकीट क्रमांक १: तांत्रिक कागदपत्र**

१) निविदेची किंमत रु.१,०००/- ही ऑनलाईन व बयाणा रक्कमही (EMD) निविदा रक्कमेच्या १% Online पद्धतीने तांत्रिक लिफाफयासोबत अपलोड करण्यात यावा.

२) मक्तेदार यांचा पाणी पुरवठा करणे कामाचा अनुभव दाखला (Similar Type of work done) जोडणे आवश्यक आहे.

३) जीएसटी प्रमाणपत्र व जीएसटी रिटर्न भरल्याचे प्रमाणपत्र तसेच आयकर परतावा प्रमाणपत्र.

०४) ZP नोंदणी प्रमाणपत्र.

५) निवीदाधारक काळ्या यादीमध्ये समाविष्ट नसलेबाबत प्रतिज्ञापत्र व अटी शर्ती मान्य असलेबाबत संमती पत्र.रु.१००/- चे स्टॅपपेपर वर सादर करणे आवश्यक राहील.

६) जल जीवन मिशन अंतर्गत घेण्यात आलेले कामे अत्यंत असमाधानकारक असलेल्या मक्तेदारांना कामातून वगळण्यात येईल याची नोंद घ्यावी.

७) काम देण्याबाबतचा अधिकार जि. प. नंदुरबार कडे राखुन ठेवण्यात आलेला आहे.

८) स्थळभेटीचे फोटो अपलोड करणे आवश्यक आहे.

**ब) पाकीट क्र. २: व्यापारी देकार**

१) निविदा उघडतांना सर्व निविदाधारकांनी PDF फॉर्ममध्ये अपलोड केलेल्या कागदपत्रांची तपासणी कमीटीव्दारे करणेत येईल. वरील प्रमाणे संपूर्ण कागदपत्रे परिपूर्ण असलेल्या निविदाच विचारात घेतल्या जातील अन्यथा निविदा रद्द करणेत येइल व त्या निविदाधारकांचे ऑनलाईन बीड उघडणेत येणार नाही.

२) निविदेमधील सर्व विवरण पत्रातील दर नमुद करणे आवश्यक राहील.

३) जिल्हयातील ग्रामीण भागात विविध योजनांतर्गत Rising Main, Pumping Machinery, Deepening Of Well, Distribution System इ. असे कामाचे स्वरुप आहे.

४) वाटाघाटी अंती मंजुर केलेल्या दरांनी काम करावे लागेल. कामाची निकड व व्याप्ती विचारात घेता कामाचे आदेश विभागून अथवा एकत्रित दिल्यास ते स्विकारणे निविदाधारकावर बंधनकारक राहिल. व त्याप्रमाणे काम करावे लागेल. मंजूर करणेत आलेले दर करारनाम्याचे दिनांका पासून एक वर्षासाठी अथवा विभागानं पुढील दर मंजूर करेपर्यंत निविदाधारकावर बंधनकारक राहतील. कामाची निकड विचारात कार्यादेश जिल्हा

५) टंचाई अंतर्गत कार्यादेश जिल्हा परिषदेने दिला तरी त्याप्रमाणे काम करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. कार्यादेशाप्रमाणे काम पूर्ण न केल्यास व निविदाधारकाचे चुकीमुळे ग्रामस्थांना अडचण निर्माण झाल्यास जिल्हा परिषदेने त्या ठिकाणचे काम इतरत्र जादा दराने करुन घेतलेतर जादा द्यावी लागणारी रक्कम निविदाधारकाला देय असणाऱ्या रकमेतून कपात करुन घेणेत येईल व त्याकरिता दंडनीय कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत केली जाईल. कार्यादेशातील मुदतीप्रमाणे सबळ कारणाशिवाय व त्याच्या आवश्यक पुराव्याशिवाय निविदाधारकाने काम पूर्ण न केल्यास जि.प. मार्फत दंडनीय कार्यवाही केली जाईल.

६) शासकीय नियमाप्रमाणे आवश्यक (TPI) रिपोर्ट देणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.आवश्यक कागदपत्रांची पुर्तता न केल्यास निविदाधारकाला देयक अदा केले जाणार नाही. वेळेचे वेळी सर्व बाबींची पुर्तता करणे निविदाधारकाला बंधनकारक राहील.

७) नंदुरबार जिल्हयातील कोणत्याही ग्रामीण भागात सर्वेक्षणाअंती निवडलेल्या जागेवर तात्पुरती नळ पाणी पुरवठा योजना उपांगे मंजूर दरांवर कोणताही जादा आकार मिळणार नाही.

८) तात्पुरती नळ पाणी पुरवठा योजना उपांगे पूर्ण झालेनंतर बाबतचा लेखी अहवाल संबंधित उप अभियंता उपविभाग यांना सादर करावा लागेल. सरपंचाचे प्रमाणपत्र, इ. कागदपत्रेही काम पूर्ण होताच संबंधित उप अभियंता उपविभाग यांना सादर करावे लागतील.

९) तात्पुरती नळ पाणी पुरवठा योजना काम करत असलेल्या सर्व कामगारांची जबाबदारी निविदाधारकावर राहील. कामाचे ठिकाणी अपघात झाल्यास त्याची कोणतीही भरपाई मिळणार नाही.

१०) देयकातून नियमाप्रमाणे शासकीय जीएसटी कर, आयकर, शासकीय कामगार विमा, शासकीय कामगार उपकर कपात करणेत येईल.

११) प्रशासकीय कारणास्तव नियमात केलेले बदल निविदाधारकावर बंधनकारक राहतील व कामांबाबत व दरांबाबत कोणत्याही प्रकारचा वाद झाल्यास त्यावर म. मुख्य कार्यकारी अधिकारी हे जो निर्णय देतील तो निविदाधारकावर बंधनकारक राहील व त्यास न्यायालयात आव्हान देता येणार नाही.

**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद नंदुरबार**